## निवडक

### साखळी रवींद्र भवनत रविवारी 'सांगत्ये ऐका'

**टीम दैनिक हेराल्ड**

डिचोली, दि. ६ : प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री हंसा वाडकर यांच्या आत्मचरित्रावर आधारित 'सांगत्ये ऐका' हा एकपात्री अविष्कार रविवार, दि. ९ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७ वा. साखळी रवींद्र भवन सभागृहात आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती रवींद्र भवनात आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. या पत्रकार परिषदेला रवींद्र भवनचे उपाध्यक्ष दत्ताराम चिमुलकर, संचालक शशिकांत नार्वेकर, स्नेहा देसाई, रविराज च्यारी, कला विभागाचे प्रमुख श्रीनेश हिंदे, कार्यक्रम संयोजक जेस लुईस आदींची उपस्थिती होती. या नाट्यविष्काराचे सूत्रधार अरूण काकाडे हे असून रंगावृत्ती व दिग्दर्शन विश्वास सोहानी यांचे असून अभिनेत्री मानसी कुलकर्णी यांच्या अभिनयातून हंसा वाडकर यांचा जीवनप्रवास उलगडणार आहे. मुद्राभिनय आणि देहबोली यांचा सुयोग्य वापर करत हंसाबाईंचं अवधं चरित्र आणि चारित्र्य त्यांनी उभं केलं आहे. नेपथ्यकार एकनाथ कदम यांनी फ्लडलाइट्स, मोठा आरसा, ऑर्गन, चित्रपट दिग्दर्शकाची खुर्ची, कॉस्च्युम्सचा पेटारा, फिल्मची रिळं आदींतून आवश्यक ती वातावरणनिर्मिती केली आहे. हृषिकेश आमरे यांनी प्रकाशयोजनेतून यातले प्रसंग नाट्यपूर्ण केले आहेत. सुहिता थते यांची वेशभूषा आणि शरद विचारे यांची रंगभूषा नाटकाला आवश्यक ते दर्शनी रूप बहाल करते.

---

### देवसू येथील ब्राह्मण देवाचा आज कलश वर्धापनदिन

**टीम दैनिक हेराल्ड**

पेडणे, दि. ६ : देवसू येथील श्री देव ब्राह्मण देवाचा कलश वर्धापनदिन सोहळा उद्या शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त मंदिरात सकाळ धार्मिक विधी, लघुरुद्र , दुपारी १ वाजता महाप्रसाद होणार आहे. या कार्यक्रमाला भाविकांनी आणि ग्रामस्थांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे .

---

### मदनंत क्लबची उद्या बैठक

**टीम दैनिक हेराल्ड**

सावईवेरे, दि. ६ : येथील मदनंत क्रिकेट क्लबची सर्वसाधारण बैठक येत्या शनिवारी, दि. ८ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७.३० वा. क्लबच्या सभागृहात बोलाविण्यात आली आहे. या बैठकीत क्लबच्या वर्धापनदिन कार्यक्रमासंबंधी चर्चा करण्यात येणार असून या बैठकीला सर्व सदस्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन क्लबचे अध्यक्ष बाबुराव शेट्ये यांनी केले आहे.

---

### गोसेवेसाठी २४ रोजी 'आनंद संध्या'

**टीम दैनिक हेराल्ड**

डिचोली, दि. ६ : मुंबईची सुप्रसिद्ध तथा प्रतिथयश गायिका धनश्री देशपांडे तसेच गोव्याचे सुप्रसिद्ध गायक राजेश मडगांवकर व अन्य संगीत क्षेत्रातील प्रसिद्ध कलाकार स्वतः हून गोशाळेच्या भव्य प्रकल्पाला निधी जमवण्यासाठी 'आनंद संध्या' (पर्व दुसरे पुष्प – २) हा सुमधुर संगीताचा कार्यक्रम (सुप्रसिद्ध सिने अभिनेते (मुंबई) श्री विघ्नेश जोशी यांचे सूत्र निवेदन) शिकेरी गोशाळेच्या प्रेक्षगृहात होणार आहे. दि. २४ फेब्रुवारी रोजी हा कार्यक्रम होईल. कार्यक्रमानंतर, आयोजकातर्फे भोजनाची व्यवस्था केली जाईल.

---

### हरमल केंद्रातील बारावी परीक्षेची आसन व्यवस्था

**टीम दैनिक हेराल्ड**

हरमल, दि. ६ : गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या बारावी परीक्षेची आसन व्यवस्था, हरमल पंचक्रोशी शिक्षण संस्थेच्या उच्च माध्यमिक विद्यालय व पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात केल्याची माहिती परीक्षा कंडक्टर प्रा शांभवी पार्सेकर व निरीक्षक मीनल नायर यांनी दिली. हरमल पंचक्रोशी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इमारतीत आर्टस सी डब्ल्यू एस एन ५५९०९ ते ५५९२३ (१६)आर्टस ५५९४३ ते ५६0%८(१३६) , कॉमर्स ५६०७९ ते ५६२२२ (१४४)व्होकेशनल (सी डब्ल्युएसएन) ५५९२४ ते ५५९४२ (१९) व्होकेशनल ५६३९५ ते ५६४५९(६५),ह्या केंद्राचे उप कंडक्टर सनील पार्सेकर तर गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात,सायन्स ५६२२३ ते ५६३९४ (१७२) उप कंडक्टर स्वप्नील शेटगावकर यांची निवड असून,त्यांची आसन व्यवस्था केली आहे.

# भारताचा इंग्लंडवर सहज विजय

## शुबमन गिल, श्रेयसअय्यर, अक्षर पटेलची अर्धशतके : मालिकेत १-० ने आघाडी

**नागपूर, दि. ६** : शुबमन गिलची (८७), श्रेयस अय्यरची (५९) वादळी आणि महत्त्वपूर्ण फटकेबाजी, संकटमोचक अक्षर पटेलचे (५२) अर्धशतक आणि भारताच्या गोलंदाजांची भेदक गोलंदाजी यासह भारतीय संघाने इंग्लंड संघावर पहिल्या वनडेत सहज विजय मिळवला आहे.नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी उतरलेला इंग्लंड २४८ धावा करत ४७.४ षटकांत सर्वबाद झाला. तर भारताने ३८.४ षटकांत इंग्लंडवर ४ विकेट्सने विजय नोंदवला. इंग्लंडवरील ५ विकेट्सने मिळवलेल्या विजयासह भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी चांगल्या लयीत असल्याचे दाखवून दिले आहे. या विजयासह मालिकेत १–0 अशी आघाडी घेतली आहे.

इंग्लंडकडून मिळालेल्या २४९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पदार्पणवीर यशस्वी जैस्वाल आणि कर्णधार रोहित शर्माने सुरूवात केली. पण आर्चर आणि साकिब महमूद यांच्या उत्कृष्ट गोलंदाजीसमोर फारश्या धावा दोघांना करता आल्या नाहीत आणि दोघेही झेलबाद होत माघारी परतले. कर्णधार रोहितने (२) पुन्हा एकदा निराशा केले. कसोटी फॉर्मेटमध्ये त्याचा खराब फॉर्म वनडेमध्येही कायम राहिला.

रोहित बाद झाल्यानंतर मैदानावर आलेल्या श्रेयस अय्यरने आक्रमक सुरूवात केली आणि भारतीय संघात पुन्हा एकदा दमदार पुनरागमन केले. श्रेयस अय्यर आणि शुबमन गिल यांनी दमदार खेळी करत विजयाचा पाया रचला. विशेषतः, अय्यरने येताच आक्रमक फलंदाजी केली आणि आर्चरच्या षटकात २ षटकार आणि १ चौकारा लगावत आपले मनसुबे जाहीर केले. अय्यरने अवघ्या ३० चेंडूत अर्धशतक झळकावले पण त्याला आपल्या डावाचे मोठ्या धावसंख्येमध्ये रूपांतर करता आले नाही. श्रेयसने ९ चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ५९ धावांची धडाकेबाज खेळी साकारली. श्रेयस ५९ धावा करून बाद झाला असला तरी तो त्याचे काम करून गेला. श्रेयसने भारताच्या विजयाचा पाया रचला. शुभमन गिल आणि अक्षर पटेल या दोघांनी त्यावर कळस चढवला.

अक्षर पटेलने ५२ धावांची खेळी करत गिलला चांगली साथ दिली. अक्षरने गिलबरोबर १०८ धावांची भागीदारी केली, ज्यामुळे विजय निश्चित झाला. अर्धशतक झळकावल्यानंतर अक्षर आदिल रशीदच्या गोलंदाजीवर बाद झाला, तर शुबमन गिल त्याच्या शतकापूर्वी ८७ धावांवर बाद झाला. यानंतर हार्दिक पांड्या आणि रवींद्र जडेजाने




संघाला विजयावर शिक्कामोर्तब केले. भारताने ३८.४ षटकांत इंग्लंडवर ६ गड्यांच्या मोबदल्यात विजयी लक्ष्य सहज गाठले. इंग्लंडतर्फे रशिद, मसूदने प्रत्येकी दोन– दोन गडी बाद केले. आर्चरने एक गडी टिपला.

तत्पूर्वी, भारतीय संघाने या सामन्यात प्रथम गोलंदाजी करत मोहम्मद शमीने दमदार सुरुवात केली. पण दुसऱ्या बाजूने इंग्लिश सलामीवीराने एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या हर्षित राणाची चांगलीच धुलाई केली. फिल सॉल्ट आणि बेन डकेटने अवघ्या ९ षटकांत ७५ धावा करत जोरदार सुरूवात केली. पण फिल सॉल्ट धावबाद झाल्यानंतर टीम इंडियाने पुनरागमन केले. यात हर्षितची महत्त्वाची भूमिका महत्त्वाची होती. त्याने आधी बेन डकेट (३२) आणि नंतर हॅरी ब्रूक (0) यांची विकेट घेतली. रवींद्र जडेजाने पुन्हा जो रूटला (१९) आपला बळी बनवले. मधल्या फळीत कर्णधार जोस बटलरसह युवा अष्टपैलू जेकब बेथलने संघाचा डाव उचलून धरला. प्रथम बटलरने (५२) अर्धशतक झळकावले आणि नंतर तो बाद झाल्यानंतर जेकब बॅथल (५१) यांनी संघाला २०० धावांचा टप्पा गाठून दिला. त्याने आपले अर्धशतकही पूर्ण केले मात्र तोही जडेजाच्या गोलंदाजीवर बाद झाला. शेवटी, जोफ्रा आर्चरने (२१) काही मोठे फटके मारले आणि संघाला २४८ धावांपर्यंत नेले. हर्षित आणि जडेजाने प्रत्येकी ३ विकेट घेतले, तर शमी, अक्षर आणि कुलदीप यादव यांना १–१ विकेट मिळवण्यात यश मिळाले.





# हस्तकला प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांमधील सर्जनशील क्षमतांचा शोध

## डॉ. प्रवीणा केरकर : आंबिये महाविद्यालयात तीन दिवसीय हस्तकला प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात

**टीम दैनिक हेराल्ड**

**पेडणे, दि. ६** : सध्याच्या काळात व्यावहारिक आणि व्यावसायिक शिक्षणाला अत्यंत महत्त्व आहे. वाणिज्य विभागातर्फे आयोजित केलेल्या हस्तकला प्रशिक्षण आणि जागरुकता कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमधील सर्जनशील क्षमतांचा शोध घेऊन त्या क्षमतांचा विकास निश्चितच होईल, असे प्रतिपादन संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, विर्नोडाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर यांनी केले.

संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा येथील वाणिज्य विभाग आणि भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या विकास आयुक्त (हस्तकला) यांच्या संयुक्त विद्यमाने हस्तकला प्रशिक्षण आणि जागरुकता या कार्यक्रमांच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य प्रवीणा केरकर बोलत होत्या.

यावेळी विकास आयुक्त (हस्तकला) च्या सहाय्यक संचालक राजेश्वरी के.एम. पदव्युत्तर वाणिज्य विभागाचे समन्वयक डॉ. वीरेंद्र आमोणकर, प्रा. देवानंद वेलिंगकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमांचे संपूर्ण आयोजन पदव्युत्तर वाणिज्य विभागाचे समन्वयक डॉ. वीरेंद्र आमोणकर यांनी केले. डॉ.आमोणकर यांनी उद्घाटन सत्रात कार्यक्रमाची उद्दिष्टे मांडली. राजेश्वरी के.एम. यांनी प्रमुख मार्गदर्शकांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन सिद्धांत कळंगुटकर यांनी केले तर आभार प्रा. देवानंद वेलिंगकर यांनी मानले. समारोपाच्या दिवशी मान्यवरांच्याहस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.




### विद्यार्थ्यांनी गिरवले हस्तकलेचे धडे

**या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मातीकाम, टेराकोटा काम, लाकूडकाम, नारळ कोरीव काम, कॅनव्हास पेंटिंग आणि भरतकामाचे प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमात एकूण १५० विद्यार्थी सहभागी झालेले होते. ५० विद्यार्थ्यांचे तीन गट करून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. गिरीश गुजर, संदेश कुंभार, हर्षा पेडणेकर आणि श्वेता सावर्डेकर या तज्ज्ञांनी या तीन दिवसीय कार्यक्रमात मार्गदर्शन केले.**

> **हस्तकलेत विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा पुरेपूर वापर करून त्यांच्यातील उद्योजकीय कौशल्यांचा शोध घेणे, त्यांना सरकारी योजनांच्या आधारे लहान लहान व्यवसाय उभे करण्यात मदत करणे या बाबींवर या तीन दिवसीय कार्यक्रमात भर देण्यात आला.**
> **– डॉ.वीरेंद्र आमोणकर,**
> **मुख्य समन्वयक, हस्तकला प्रशिक्षण आणि जागरुकता कार्यक्रम.**



मांद्रे : विजेत्या संघासोबत क्रीडाशिक्षक विराज म्हामल आणि शाळेचे मुख्याध्यापक शरद गावडे.

# खलप हायस्कूलला व्हॉलिबॉल स्पर्धेचे विजेतेपद

**टीम दैनिक हेराल्ड**

हरमल, दि. ६ : मांद्रे येथील रमाकांत खलप हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी किटला स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, हळदोणा येथे आयोजित जिल्हा स्तरावरील व्हॉलिबॉल स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या श्रेणीमध्ये विजेतेपद पटकावले. या स्पर्धेचे आयोजन गोव्याच्या क्रीडा आणि युवा व्यवहार संचालनालयाने केले होते. या स्पर्धेत मांद्रेच्या खलप हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी शानदार खेळाचे प्रदर्शन करून विजेतेपद मिळवले. या विद्यार्थिनींना क्रीडाशिक्षक विराज म्हामल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले गेले होते. त्यांच्या कष्ट आणि मेहनतीचा यशस्वी परिणाम म्हणून त्यांनी विजेतेपद मिळवले,असे कौतुगोदगर मुख्याध्यापक गावडे यांनी व्यक्त केले.

शाळेचे मुख्याध्यापक शरद गावडे, संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. रमाकांत खलप, व्यवस्थापन सदस्य आणि पालकांनी या विजयानंतर विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.

# मैदानी खेळांमुळे मुलांचा शारीरिक, बौद्धिक विकास : मनुजा नाईक

**टीम दैनिक हेराल्ड**

सावईवेरे, दि. ६ : व्यायाम, योगा, मैदानी खेळ व समतोल आहार हे आरोग्य सुधारण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. मैदानी खेळ खेळल्यास मुलांचे आरोग्य तंदुरुस्त व निरोगी राहते. याशिवाय मुलांचा शारीरिक तसेच बौद्धिक विकास होतो. त्यामुळे मुलांनी शिक्षणाबरोबरच खेळाला महत्त्व द्यावे, असे प्रतिपादन कवळेच्या सरपंच मनुजा नाईक यांनी केले.

कवळे शाळा समुहाचा प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावर आयोजित केलेला क्रीडा मेळावा कपिलेश्वरी मैदानावर नुकताच उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याचे उद्घाटन सरपंच मनुजा नाईक यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्या बोलत होत्या.

या उद्घाटन सोहळ्यास शारीरिक शिक्षक आत्माराम नाईक, केदार सावईकर, स्वर्ण नाईक व समुहाचे गटप्रमुख गीतेश वेरेकर उपस्थित होते.

सर्वप्रथम समुहाचे गटप्रमुख गीतेश वेरेकर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. यानंतर मनुजा नाईक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. वेदांत सावंत याने प्रतिज्ञा सादर केली. सूत्रनिवेदन शिक्षिका गौतिमा ढवळीकर यांनी केले. तर शिक्षिका आतिषा पालकर यांनी आभार मानले. या क्रीडा मेळाव्यात स. प्रा. वि. कुर्पास, स. प्रा. वि. गाळाशिरे, स. प्रा. वि. कपिलेश्वरी, एस. एस.समिती कवळे, श्री सरस्वती विद्यालय व एस. एस.समिती ढवळी अशा सहा प्राथमिक शाळांचा तसेच श्री सरस्वती हायस्कूल कवळे, लोकमान्य टिळक हायस्कूल कवळे व आय. व्ही. बी. डी. हायस्कूल ढवळी अशा तीन हायस्कूलचा समावेश होता.



# साखळीतील मॉर्निंग ११ ने पटकावला एमजीपी चषक २.0

**टीम दैनिक हेराल्ड**

डिचोली, दि. ६ : कुंडई फोंडा येथे आयोजित अखिल गोवा पंचायत व नगरपालिका पातळीवरील सिझन बॉल क्रिकेट स्पर्धेत साखळीतील मॉर्निंग अकरा या संघाने विजेतेपद मिळवत एमजीपी चषक २.0 पटकावला. अंतिम सामन्यात मेच फिक्सिंग कारापूर संघाचा पराभव केला.

कुंडई येथे पंचायत मैदानावर खेळविण्यात आलेल्या या एमजीपी चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना साखळीच्या मॉर्निंग अकरा संघाने ९२ धावा काढल्या. तर प्रत्युत्तरादाखल मैदानात उतरलेल्या कारापूर येथील मेच फिक्सिंग कारापूर संघाला ६३ धावांवर सर्वबाद करून २८ धावांनी हा सामना जिंकला.

स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज म्हणून युवराज पर्येकर तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून यश गावकर यांना वैयक्तिक बक्षिसे प्राप्त झाली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

बक्षीस वितरण सोहळ्यास मगोचे नेते तथा माधवराव ढवळीकर ट्रस्टचे विश्वस्त मिथिल ढवळीकर, मगोचे नेते रोहन हरमलकर, कुंडईचे सरपंच सर्वेश गावडे, गोवा एक्राचे प्रशांत पाताडे, दिलीप नाईक, सामाजिक कार्यकर्ते संकेत नाईक मुळे, माजी रणजी खेळाडू गौरीश पाताडे, कुंडईचे माजी सरपंच लक्ष्मण जल्मी, पंचसदस्य संदीप जल्मी, विकी परब, माजी खेळाडू संजय भंडारी आदींची उपस्थिती होती.




कुंडई : एमजीपी चषक विजेता साखळीचा संघ मॉर्निंग अकराच्या खेळाडूंसह उपस्थित मान्यवर मिथील ढवळीकर, रोहन हरमलकर, सरपंच सर्वेश गावडे व इतर.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १५५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 155 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .